जनसंपर्क कक्ष
सकाळ 23 JUL 2024 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये स्थान मिळवा


## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; शिवाजी विद्यापीठात स्कोपस जागरुकता कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : 'शिवाजी विद्यापीठाचा लौकिक हा जागतिक स्तरावर प्रकाशित होणाऱ्या संशोधनाच्या दर्जामुळे सातत्याने उंचावत आहे. त्यामुळे संशोधकांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये आपले संशोधन प्रकाशित व्हावे, यासाठी दर्जेदार संशोधन करावे,' असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्यातर्फे आयोजित 'स्कोपस व निंबस' याविषयी जागरूकता कार्यक्रमात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'संशोधनासाठी विविध प्रकारची संदर्भसाधने हाताशी असणे अत्यावश्यक असते. आता सर्व संदर्भसाधने ऑनलाईन उपलब्ध आहेत.




शिवाजी विद्यापीठात सोमवारी स्कोपस व निम्बसविषयी जागरुकता कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. यावेळी डावीकडून डॉ. सचिनकुमार पाटील, धनंजय सुतार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के , गिरीश कुलकर्णी उपस्थित होते.

यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावणे शक्य झाले आहे. हे दर्जा निश्चितीचे काम स्कोपस आणि निम्बससारखे निर्देशांक करतात. गेल्या वर्षभरात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचे सुमारे ९०० शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पत्रिकांतून प्रकाशित झाले. त्यांनी सुमारे दीड लाख सायटेशन्स मिळाले. विद्यापीठाच्या एच-इंडेक्स १३५ च्या घरात आहे, जो महाराष्ट्रात सर्वाधिक आहे.'

ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. रुपाली भोसले, एस. डी. हजारे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी आभार मानले. दरम्यान, मुंबईच्या ग्लोबल इन्फॉर्मेशन सिस्टीम टेक्नॉलॉजीचे संचालक गिरीश कुलकर्णी यांनी निम्बसच्या, तर नवी दिल्लीच्या एल्सव्हियरच्या कस्टमर कन्सल्टंट ऐश्वर्या नायल यांनी स्कोपसच्या उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात, वाय. जी. जाधव आदींनी केले.

### संशोधकांनी प्रयत्न करण्याची गरज


कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठासह देशातील महत्त्वाच्या विद्यापीठांचा संशोधकीय वेध घेतला असता भौतिकशास्त्र, मटेरियल सायन्स, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र अशा निवडक विषयांतील संशोधनाची संख्या अत्यधिक असल्याचे जाणवते. मानव्यशास्त्र, सामाजिक विज्ञान शाखांकडील विषयांतील संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होण्याचे प्रमाण कमी आहे. मराठीसारख्या विषयांचा अपवाद गृहित धरला तरीही या विद्याशाखांमधील संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्याच्या दृष्टीने संशोधक, विद्यापीठांनीही प्रयत्न करण्याची गरज आहे.'

जनसंपर्क कक्ष
लोकमत 23 JUL 2024 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करावे

## डॉ. प्रमोद पाटील : स्कोपस व निंबस यांविषयी जागरूकता कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा संशोधकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये आपले संशोधन प्रकाशित व्हावे, यासाठी दर्जेदार संशोधन करावे, असे आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ तथा शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सोमवारी केले. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या वतीने एकदिवसीय 'स्कोपस व निंबस यांविषयी जागरूकता कार्यक्रम' आयोजित केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पाटील म्हणाले, संशोधनासाठी विविध प्रकारची संदर्भसाधने हाताशी असणे अत्यावश्यक असते. त्या दृष्टीने ग्रंथालये मौलिक भूमिका बजावतात. जगाच्या पाठीवरील कोणतीही माहिती, पुस्तक, संदर्भ क्षणात मिळविता येते. यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावणे शक्य झाले आहे. डॉ. शिर्के म्हणाले, मानव्यशास्त्र आणि सामाजिक विज्ञान शाखांकडील विषयांतील संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होण्याचे प्रमाण कमी आहे. या विद्या शाखांमधील संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्याच्या दृष्टीने संशोधक, विद्यापीठांनीही प्रयत्न करण्याची गरज आहे. मुंबईच्या ग्लोबल इन्फॉर्मेशन सिस्टीम टेक्नॉलॉजी (जिस्ट)चे संचालक गिरीश कुलकर्णी यांनी निंबसच्या उपयोजनाविषयी, तर नवी दिल्लीच्या एल्सव्हियरच्या कस्टमर कन्सल्टंट ऐश्वर्या नायल यांनी स्कोपसच्या उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. धनंजय सुतार, रुपाली भोसले व एस.डी. हजारे, डॉ. सचिनकुमार पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२३ III २०२१
तरुण भारत

# 'संशोधकांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करावे'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा लौकिक हा जागतिक स्तरावर प्रकाशित होणाऱ्या संशोधनाच्या दर्जामुळे सातत्याने उंचावत आहे. त्यामुळे संशोधकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये आपले संशोधन प्रकाशित व्हावे, यासाठी दर्जेदार संशोधन करावे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्कोपस व निंबस यांविषयी जागरुकता कार्यक्रम'त ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
23 JUL 2024

लोकमत



एस. पी. वेल्थचे संस्थापक अनिल पाटील यांनी ११ हजार रुपयांची देणगी भगवान महावीर अध्यासनास दिली.

# महावीर अध्यासनाच्या निधी संकलनासाठी बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या निधी संकलनासाठी अध्यासन सल्लागार समितीचे सदस्य व कोल्हापुरातील व्यापारी, उद्योजक व डॉक्टर यांची बैठक जैन बोर्डिंग येथे पार पडली.

श्वेतांबर जैन व इतर समाजातीलही व्यक्तींकडून देणगी संकलनाचा प्रयत्न करण्याची भावना सदस्यांनी मांडली. जैन बोर्डिंगचे सचिव सुरेश शेटे यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक प्रा. विजय ककडे यांनी नूतन इमारतीचा आराखडा व आवश्यक निधी याबाबत माहिती दिली. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी देणगीसंदर्भात केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. सदस्य जिवंधर चौगले यांनी व्यक्तिगत संपर्कातून देणगी संकलन करण्यावर भर देण्याचे आवाहन केले. या बैठकीत एस. पी. वेल्थचे संस्थापक अनिल पाटील यांनी ११ हजार रुपयांची देणगी अध्यासनास दिली. यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2024

पुण्यनगरी

# उद्यापर्यंत सर्व परीक्षा स्थगित

कोल्हापूर : जिल्ह्यात सुरू असणाऱ्या अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या विविध विभागांच्या परीक्षा बुधवार, दि. २४ पर्यंत स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे, अशी शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



**शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा निर्णय**

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत चार दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी, वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेता सोमवार, मंगळवार आणि बुधवारी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. पुढे ढकललेले पेपर कधी होणार यासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. तरी महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2024

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षा उद्यापर्यंत स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठअंतर्गत सोमवारी होणारी परीक्षा स्थगित करण्यात आली होती. परंतु, पावसाचा जोर कायम राहिल्याने आज, मंगळवार व उद्या, बुधवार या दोन दिवसांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्याची माहिती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी, वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाने आज, मंगळवार आणि उद्या, बुधवारी होणाऱ्या सर्व विषयांच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. पुढे ढकललेले पेपर कधी होणार या संदर्भातील माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उद्यापर्यंतच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या २२ ते २४ जुलैपर्यंतच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. गेल्या चार दिवसापासून पावसाचा जोर कायम असल्याने हा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांना यासंदर्भातील माहिती एसएमएसव्दारे कळवण्यात आली आहे. तर ही माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे आदेश महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत, अशी शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात गेल्या चार दिवसापासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाने सोमवार, मंगळवार आणि बुधवार तीन दिवस होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पुढे ढकललेल्या परीक्षेचे बदलेले वेळापत्रक यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे. तरी महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलल्या आहेत, याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठातील परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे.



- परीक्षा व मूल्यमापन मंडळाची परिपत्रकाव्दारे माहिती
- एसएमएसव्दारे विद्यार्थ्यांना सूचना

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2024

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून २३, २४ जुलैच्या सर्व परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** अतिवृष्टी व पुराच्या स्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाने पूर्वनियोजित २३ व २४ जुलै रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२४ उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. अतिवृष्टीमुळे विद्यापीठाने सोमवारची परीक्षा स्थगित केली होती. सध्या पावसाची संततधार सुरू आहे. नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. काही भागातील रस्ते बंद आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अडचणी उद्‌भवू शकतात. पावसाचा जोर कायम राहिल्याने २३ व २४ या दोन दिवसांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे कळवली आहे. महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक नव्याने जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या आज, उद्याच्या परीक्षा स्थगित

कोल्हापूर : अतिवृष्टी असल्याने अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येणे शक्य होणार नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने उद्या, मंगळवारी आणि बुधवारी (ता. २४) होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या. त्यात लॉ आणि फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात चार दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी, वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेता विद्यापीठाने आज होणारे सर्व विषयांचे पेपर पुढे ढकलले. पावसाचा जोर कायम असल्याने विद्यापीठाने मंगळवारी, बुधवारी होणाऱ्या परीक्षाही स्थगित केल्या आहेत. या परीक्षांसाठी लॉ अभ्यासक्रमाच्या तृतीय, चतुर्थ वर्ष आणि बी. फार्मसी, एम. फार्मसीच्या द्वितीय वर्षाच्या सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. परीक्षा स्थगित केल्याबाबत विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे कळविले आहे. पुढील परीक्षांबाबत बुधवारी निर्णय घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2024
Times of India

## SUK postpones exams due to the downpour

Given the heavy rainfall in Kolhapur, Satara and Sangli districts, SUK postponed its exams. There are 295 colleges affiliated with Shivaji University in the three districts with nearly 2.5 lakh students.

Ajitsinh Jadhav, the director of the exam and evaluation department of SUK, said, "Due to the heavy rain in Kolhapur, Sangli and Satara, several roads are shut. Students may have trouble reaching the exam centres. All the exams scheduled between July 22 and 24 have been postponed till further notice.

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत 23 JUL 2024 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माने महाविद्यालयात २६ रोजी युवा महोत्सव माहिती कार्यशाळा

## प्र. प्राचार्या डॉ .निला जोशी व हसीना मालदार यांची माहिती

प्रतिनिधी
कागल

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि डी. आर . माने महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील डी .आर .माने महाविद्यालयात एक दिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे . शुक्रवार २६ जुलै रोजी ही कार्यशाळा संपन्न होणार आहे . अशी माहिती प्रभारी प्राचार्या डॉ . निला जोशी व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा .हसीना मालदार यांनी पत्रकार परिषदेत दिली .यावेळी सिनेट सदस्य अमरसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती .

या युवा महोत्सव माहिती कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ .पी. टी. गायकवाड हे उपस्थित राहणार आहेत .तर अध्यक्षस्थानी दि कागल एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रताप माने असणार आहेत . या कार्यक्रमासउपाध्यक्ष सुनील माने, जिल्हा समन्वयक डॉ .आर.एच



कागल – पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रभारी प्राचार्या डॉ . निला जोशी व महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा . हसीना मालदार .

अतिग्रे, दीपक बिडकर, प्रा.डॉ.आदिनाथ गाडे, कॅम्पस डायरेक्टर डॉ . प्रवीण चौगुले हेही उपस्थित राहणार आहेत .

शुक्रवार दिनांक २६ रोजी ही कार्यशाळा शिक्षण महर्षी वाय.डी.माने सभागृहात संपन्न होणार आहे . या कार्यशाळेत सुमारे ३०० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित राहणार आहेत .या एक दिवशीय कार्यशाळेला कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या डॉ .निला जोशी यांनी केले .